# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक ( उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
## जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर ४४० ००१

Website:www.jdnagpur.in Email: jdhengp@rediffmail.com
Phone No.0712- 2561713 Fax No.0712- 2554210

क्रं.उशिनाग/अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती/ ५५४८ /२०१९ दिनांक १३/०९/२०१९

प्रति,

१. कुलसचिव,रा.तु.म, नागपूर विद्यापीठ, नागपूर
२. कुलसचिव,कवि कुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक
३. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. कुलसचिव, विधी विद्यापीठ, नागपूर
५. सहसंचालक, तंत्रशिक्षण, सदर, नागपूर
६. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण सिव्हील लाईन, नागपूर
७. उपसंचालक, उच्च शिक्षण, विभाग, नागपूर
८. संचालक, शास./सर्व प्राचार्य अशासकीय अनु./विना अनु./कायम विना अनु. महाविद्यालये/संस्था नागपूर विभाग, नागपूर

**विषय :- केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी NSP पोर्टलवरून महाविद्यालयाची नोंदणी करणेबाबत.**

**संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं-२०१९-२०/केंद्र पुरस्कृत/शिष्यवृत्ती/११७७५, दिनांक १३.०९.२०१९**

केंद्रशासनाच्या एन. एस. पी. पोर्टलद्वारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत १. केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना २. महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना ३. अपंग विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना या तीन योजनांची ऑनलाईन पद्धतीने अंमलबजावणी करण्यात येते. सदरहू योजनेची सविस्तर माहिती संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

सर्व महाविद्यालय/संस्था यांना त्यांचे लॉगीनमधून ऑनलाईन पद्धतीने AISHE/U-DISE/NCVT/SCVT CODE सह NSP पोर्टलवर पुनर्नोंदणी करणेबाबत संचालनालयाच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. परंतु बहुतांशी महाविद्यालये/ संस्था यांनी अद्यापपर्यंत नोंदणी केलेली नाही.

तरी याबाबत, कनिष्ठ महाविद्यालये/(इयत्ता ११ वी, १२ वी फक्त) वरिष्ठ महाविद्यालये (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र) अध्यापक महाविद्यालये (डी.टी.ई.डी.) आयटीआय, पॉलीटेक्निकल, नर्सिंग डिप्लोमा इत्यादी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी दि. १५.९.२०१९ पर्यंत NSP पोर्टलवर पुनर्नोंदणी न केल्यास व विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित महाविद्यालय/ संस्था यांची राहील याची नोंद घ्यावी.

सहसंचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/NSP/2019/ 2821
दिनांक :- 16 SEP 2019

प्रति,
प्राचार्य,
सर्व पदविका संस्था ,नागपूर विभाग, नागपूर .

**आपणांस कळविण्यांत येते की, सन 2019-20 साठी National Scholarship Portal वरील केंद्रशासन पुरस्कृत ~~गुणवत्ता-नि-साधन~~ Post Matric शिष्यवृत्ती योजनेच्या अंमलबजावणी करिता, सदर पत्रात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी, अन्यथा सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखाची राहील.**

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.